
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# रघुनाथ धोंडो कर्वे: आधुनिक भारतातील लैंगिक शिक्षणाचे अग्रगण्य प्रसारक आणि प्रचारक



डॉ. आयेशा म. सादिक रंगरेज[1] , मनिषा मोहन कांबळे[2]
[1]मार्गदर्शक, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन , सोलापूर.
[2]संशोधक, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.

**सारांश:**

लैंगिक शिक्षण या विषयाला आजही समाजमान्यता नाही. तरीही रघुनाथ धोंडो कर्वे यांनी लैंगिक शिक्षण आणि संतती नियमन या विषयावर मोठे काम केले आहे. तत्कालीन समजव्यवस्था ही लैंगिक शिक्षणाच्या व संतती नियमानाच्या विरोधी होती.तत्कालीन सनातन वृतीच्या लोकांनी त्यांच्या या कार्यावर आक्षेपाघेतला आणि त्यांच्यावर अश्लीलतेचे एकूण तीन खटले भरले होते, तरीही त्यांनी त्यांच्या पत्नीच्या साथीनी त्यांनी आपले हे कार्य अविरत पणे केले.

KEY WORDS : लैंगिक शिक्षण, संतातिनियमन, लैंगिकता, लिंग, इत्यादी.

## प्रस्तावना :

आजही लैंगिक शिक्षण हा विषय जरी काढला तरी लोकांच्या भुवया उंचावतात.पण १९व्या शतकाच्या सुरवातीलाच या विषयावर लिहण्याचे आणि समाजात जागरूकता निर्माण करण्याचे काम रघुनाथ धोंडो कर्वे यांनी केले. पण हे कार्य करताना समाजातील विरोधाला त्यांना सामोरे जावे लागले. त्यांच्यावर अश्लीलतेचे एकूण तीन खटले चालले होते तरीही ते त्यांच्या या कार्यापासून दगमगले नाहीत.

आधुनिक भारतातील लैंगिक शिक्षणाचे जनक म्हणून रघुनाथ धोंडो कर्वे यांचेच नांव घ्यावे लागेल.

रघुनाथ धोंडो कर्वे (जन्म : मुरुड-रत्नागिरी, १४ जानेवारी १८८२; मृत्यू : पुणे, १४ ऑक्टोबर १९५३) हे गणिताचे प्राध्यापक आणि महाराष्ट्रातील अग्रणी समाजसुधारक होते. हे धोंडो केशव कर्वे यांचे पुत्र होत, महाराष्टात संततिनियमन या नासक्या समजल्या जाणाऱ्या गोष्टीला कुठलीही सामजिक मान्यता नव्हती. अशा काळामध्ये सामाजिक सुधारणांचा आग्रह धरून समाजामध्ये संततिनियमन होणे आवश्यक आहे, आणि त्यासंबंधी कायदा करून त्याचा उपयोग केला जावा, अशा प्रकारचे मत र.धों कर्वे यांनी मांडले. 'समाजस्वास्थ्य' या नावाने त्यांनी मासिक सुरू करून समाज परिवर्तनाला दिशा देण्याचा प्रयत्न केला.

## संततिनियमनाचा प्रचार आणि प्रसार :

संततिनियमनाचे भारतातील आद्य प्रसारक म्हणून ज्यांची ओळख करून देता येईल असे आधुनिक संत म्हणजे रघुनाथ कर्वे. 'संततिनियम' हा शब्द भारत वर्षात प्रथम कर्वे यांनी १९२१साली वापरला, यापूर्वी संतती नियमांची संकल्पना लोकांस माहित नव्हती. समाजस्वास्थ्यासाठी संततिनियमन व लैंगिक शिक्षण यांविषयी र. धों. कर्वे यांनी

केलेले लोकांचे मत-विचार प्रबोधन, प्रवर्तन व प्रत्यक्ष कार्य फार मोलाचे आहे. ज्या काळात संततिनियमनाविषयी साधा उच्चारही करणे निषिद्ध मानले जायचे, त्या काळात रघुनाथरावांनी या विषयाचा प्रचार करून जनजागृती घडवून आणायचे ठरविले. वाचनाची अफाट गोडी आणि लहानपणापासून जडलेली अवांतर वाचनाची सवय यामुळे कर्वे यांनी अनेक शास्त्रीय पुस्तके वाचली.

### स्त्री शिक्षण विषयक दृष्टीकोन :

स्त्री मुक्ती, स्त्री शिक्षण, स्त्री-पुरुष संबंध याबाबतही कर्व्यांचा दृष्टिकोन अतिशय पुरोगामी होता. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाने कमी होत चाललेले मृत्यूचे प्रमाण व अनिर्बंध वाढत चाललेली लोकसंख्यामुळे संततिनियमनाची गरज लक्षता घेऊन रघुनाथराव कर्वे यांनी इ.स. १९२१ साली इंग्रजीत एक पुस्तक प्रकाशित केले. ह्या विषयावर संशोधन करून आपल्या राहत्या घरीच संततिनियमनाची साधने बनवून देण्याचा आधुनिक उपक्रम त्यांनी सुरू केला. पत्नी मालतीबाई कर्वे यांना बरोबर घेऊन त्यांनी कुटुंबनियोजन केंद्र स्थापन केले. नागरिकांना मार्गदर्शन केले. लैंगिक रोगांची लक्षणे, कारणे त्यावरील उपाय यांबाबत लोकांना माहिती दिली. त्यासाठी त्यांनी 'वेश्याव्यवसाय', `आधुनिक आहारशास्त्र' ही पुस्तके लिहिली.

स्वतः अपत्यहीन असूनही कर्वे यांनी संततीनियमनाची शस्त्रक्रिया करून घेतली व त्यांच्या बायकोनेही त्याला मोठ्या मनाने संमती दिली. इ.स. १९२३ साली पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत त्यांनी 'संततिनियमन' ह्या विषयावर भाषण केले. कर्वे यांनी स्वतःच्या प्रयत्नातून पहिले कुटुंब नियोजन केंद्र इ.स. १९२१ साली लंडनमधे सुरू केले,त्याच वर्षी ते भारतात सुरू झाले. स्वतःचे जीवनप्रयोजन म्हणून लैंगिक शिक्षणाचा आग्रह रघुनाथ धोंडो कर्वे यांनी अगदी इसवी सनाच्या दुसऱ्या दशकात धरला होता. लैंगिक शिक्षणाबद्दल जनजागृती करण्याचा त्यांनी ध्यासच घेतला होता. संभोग हा केवळ संतती उत्पादनासाठी नसून सुखासाठीदेखील असतो, असा त्यांचा विचार होता. पण संतती नियमनाची पुरेशी साधने, शास्त्रीय माहिती व मुख्य म्हणजे सामाजिक जाणीव नसल्यामुळे भरमसाट पोरे होत. त्यामुळे स्त्री-आरोग्यावर गंभीर परिणाम व्हायचे, कौटुंबिक आर्थिक परिस्थिती खालावायची, खूप मुले झाल्यामुळे शारीरिक सुखाची भीती वाटायला लागायची, अशा भीतीमुळे मानसिक विकृती निर्माण व्हायची, त्यातून बलात्कार, वेश्यागमन अशा गोष्टी घडत. ह्या वेश्यागमनातून बऱ्याच प्रकारच्या व्याधी निरोगी घरांमध्ये प्रवेश करायच्या. ह्या सर्व समस्यांमध्ये र. धों. कर्व्यांना त्यांच्या कट्टर शास्त्रीय दृष्टिकोनाचा खूप उपयोग झाला.

### समाजस्वास्थ्य मासिक :-

संततिनियमनाचे उद्दिष्ट समोर ठेऊन र.धों. कर्वे यांनी १५ जुलै इ.स. १९२७ ला 'समाजस्वास्थ्य' या मासिकाची सुरुवात केली. कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करून त्यावर स्वतंत्रपणे विचार करून आपली मते बनवणे व ती निर्भीडपणे मांडणे हे र. धों. कर्वे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक वैशिष्ट्य होय. यासाठी त्यांना सरकारी खात्यातील नोकरीही प्रसंगी गमवावी लागली. इ.स. १९२७ ते इ.स. १९५३ अशी २६ वर्षे ४ महिने कर्वे यांनी 'समाजस्वास्थ्य' हे मासिक मोठ्या निष्ठेने, कमालीच्या निग्रहाने चालवले. त्याद्वारे लैंगिक शिक्षणाचा प्रसार केला. वक्तशीरपणा आणि व्यवस्थितपणा ही कर्व्यांच्या व्यक्तित्वाची ठळक वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील. समाजस्वास्थ्याचे अंक प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेला प्रेसमधून येत. स्वतः सर्व बंडले बांधून, पत्ते घालून चौदा तारखेला ती सर्व पोस्टात जाऊन पंधरा तारखेला ते अंक ग्राहकांच्या हातीही पडत.

केवळ संततिनियमनाचीच नव्हे तर सर्वच लैंगिक प्रश्नांच्या बाबतीत बुद्धीप्रामाण्यवादी भूमिकेतून निकोप व निर्भय चर्चा व्हावी असा रघुनाथरावांनी आग्रह धरला तेव्हा त्यांना कर्मठ, सनातनी, धर्माभिमानी आणि जुनाट समजुती

कवटाळणाऱ्या डॉक्टरांच्या विरोधाला तोंड द्यावे लागले. कायद्याच्या कैचीत पकडून त्यांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. विरोधाची पर्वा न करता आपल्याला पटलेले विचार समाजाला पटवून देण्याचा रघुनाथरावांनी आयुष्यभर जिद्दीने प्रयत्न केला. त्यासाठी आर्थिक ओढगस्तीचे, अस्थिरतेचे आयुष्य पत्करले पण आपल्या जीवननिष्ठेबाबत तडजोड केली नाही.गणित हार्दिक रघुनाथ रावांचा विषय असला तरी लैंगिक शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी त्या क्षेत्रातील हॅवलॉक एलिस व सिगमंड फ्रॉइड यांच्या ग्रंथांचा बारकाईने अभ्यास केला.

जुलै १९२७ मध्ये ‘समाजस्वास्थ्या’चा पहिला अंक निघाला. या या अंकात हे मासिक सुरू करण्यामागचा आपला उद्देश रघुनाथरावांनी सांगितला आहे. ‘व्यक्तींच्या व समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व त्यासंबंधी उपायांची चर्चा करणे हा या मासिकाचा उद्देश आहे. विशेषतः ज्या विषयासंबंधी लेख इतर पत्रकार छापत नाहीत असे विषय कितीही महत्त्वाचे असले तरी त्यासंबंधी माहिती मिळवण्यास सामान्य वाचकांस अतिशय अडचण पडते. व ही अडचण दूर करण्याचा आमचा विचार आहे. यात तत्त्वज्ञानाचा खल न करता व्यवहारोपयोगी माहितीही दिली जाईल.’

समाजस्वास्थ्यातील प्रचारामुळे त्यांच्यावर तीन  खटलेही भरले गेले. त्यातील एक खटला खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लढला होता. जवळजवळ सत्तावीस वर्षे रघुनाथरावांनी समाजस्वास्थ्य हे मासिक चालवले." अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, सदराचा किंवा इतर वस्तूचा गुण नसतो, तो फक्त तसा आरोप करणाऱ्याच्या मनाचा गुण आहे," हे सांगणाऱ्या रघुनाथरावांच्या या कार्याचे परिणाम तत्कालीन समाजस्वास्थ्यावरही झाले. अनेक वाद झाले, खटल्यांमध्ये रघुनाथरावांना शिक्षा झाली, बराच तोटा सहन करूनही ते आपल्या मूळ कार्यापासून ढळले नाहीत.

समाजाकडून होणारी अवहेलना सोसूनही आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जे पटते ते निर्भीडपणे मांडण्याच्या रघुनाथरावांच्या वृत्तीमुळे अनंत आर्थिक अडचणींतूनही त्यांनी ‘समाजस्वास्थ्य’ चालवले. होईल ते नुकसान सोसण्याची आणि मासिकाचे काम करण्याची ताकद आहे तोपर्यंत ते चालू ठेवण्याचा बेत आहे. " कोणी काहीही म्हटले तरी या मासिकाचे एकच ध्येय आहे. ते ध्येय सर्व समंजस माणसांना मान्य झालेच पाहिजे- मग त्यांचे मार्ग या पेक्षा वेगळे असले तर असोत! 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामया:। सर्वे भद्राणि पशन्तु न कश्चित् दु:खभाग् भवेत।' या ध्येयाकरिता माझ्या अकलेप्रमाणे मी काम करीत राहणार. "मग लोक काहीही म्हणोत  असे ते म्हणत.

आपल्याला काही महत्त्वाच्या गोष्टी लोकांना सांगायच्या आहेत. आणण कसेही करून त्या सांगितल्याच पाहिजेत, असे वाटून हे मासिक काढायचे ठरवले. पण त्यात केवळ बुद्धिप्रामाण्याची तत्त्वेच सांगून मला थांबायचे नव्हते, तर ती हरघडी आचरणात आणणे, प्रत्येक विषयाला लावून त्या दृष्टीने मतप्रचार करण्याचा माझा उद्देश होता. आपले अंतिम ध्येय काय, याचा विचार मासिकाचे नाव ठरवताना करावा लागला; आणण समाजाचे कल्याण हेच ध्येय ठरवून त्याला 'समाजस्वास्थ्य' असे नाव दिले.. पण समाजाचे कल्याण साधताना सत्याकडे म्हणजे बुद्धिप्रामाण्याकडे दुर्लक्ष करून भागत नाही. कारण निसर्गाचे नियम कोणालाही बाधत नाहीत; तेव्हा त्यांना धाब्यावर बसवण्याचा फोल प्रयत्नही न करता त्यांचा समाजाला उपयोग कसा करून घेता येईल, हेच लिहणे जरूर आहे.

फ्रान्स येथील वास्तव्यामध्ये र.धों कर्वे यांनी बरेच वाचन, अभ्यास केला. तेथून येताना सोबत ट्रंका भरून संततिनियमनाची साधने व पुस्तके घेऊन आले. स्वतःच्या घरातच त्यांनी पहिले संततिनियमन केंद्र चालू केले. लोकांनी खूप हेटाळणी केली, कुचेष्टा केली, पण कर्वे आपल्या ध्यासापासून हटले नाहीत. एका वसंत व्याख्यान मालेत त्यांनी स्त्रियांनादेखील लैंगिक भावना असतात हे प्रकटपणे मांडले. त्यांचे हे स्पष्ट बोलणे बऱ्याच मान्यवरांना पचले नाही, पण स्वतःवर असलेल्या विश्वासाच्या जोरावर ते आपले हे नैसर्गिक विचार निदान काही लोकांपर्यंत तरी पोचवू शकले. त्या मोजक्या लोकांमध्ये पेरलेल्या विचारांचा बराच मोठा वृक्ष आज आपल्या समोर उभा आहे. त्यांच्या जन्माच्या वेळी त्यांच्या आईचा बाळंतपणातच देहान्त झाल्यामुळे गरोदरपणा या संदर्भात व्यवस्थित शिक्षण आणि माहिती व्हावी असा

त्यांचा आग्रह होता. २१व्या शतकातील भारतातल्या सज्ञान लोकसंख्येमध्ये निदान १०% लोक तरी संततिनियमन करीत असावेत. र. धों. कर्व्यांच्या हयातीत त्यांना केवळ कुचेष्टाच मिळाली, तरीदेखील ते केवळ स्वतःवरच्या विश्वासावर लढत राहिले, त्यांना हा आत्मविश्वास त्यांच्या पत्नीने, व आई-वडिलांनी पूर्ण खंबीरपणे त्यांच्यामागे उभे राहून दिला. जेव्हा केव्हा परिस्थिती हाताबाहेर जायची त्यात्या वेळी त्यांना रँग्लर परांजपे व शकुंतला बाई परांजपे ह्यांसारखे हितचिंतक लाभायचे. अनेक अश्लीलतेच्या कोर्ट खटल्यांमध्ये त्यांना दंड झाला. एकदा त्यांची केस बाबासाहेब आंबेडकरांनी लढवली होती. त्यामुळे जरी ते ती केस हरले तरी त्यांना बाबासाहेबांसारखा कायमस्वरूपी मित्र मिळाला.

### फ्रेंच भाषेचे ज्ञान :-

फ्रेंच भाषेचे र.धों. कर्व्यांना विशेष ज्ञान होते. त्या भाषेतील अनेक नाटके व गोष्टी त्यांनी रूपांतरित केली आहेत. नाटक, सिनेमा, ललित वाङ्मय ह्यावर 'समाजस्वास्थ्या'त टीकात्मक लेख व परीक्षणे येत. साहित्य, संगीत, अन्य कला यांची त्यांना तहान होती. देशात व जगात काय चालले आहे ह्याचे त्यांचे अवलोकन तिखट होते. एका थोर समाजसुधारकाच्या पोटी जन्म घेऊनही त्यांची वाढ खुंटली नाही. त्यांनी वडिलांच्या - महर्षी कर्वे यांच्या - पुढे अनेक पावले जाऊन समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. एकवेळ परकीयांशी लढणे सोपे असते;पण स्वकीयांबरोबर झुंज घेणे अवघड असते. लोकशिक्षणाचा मार्ग पसंत असलेल्या रघुनाथरावांनी सतत सत्तावीस वर्षे एकाकी लढत दिली, लैंगिकतेविषयी मूलगामी विश्लेषण केले.

### संतती नियमानुसार आणि लैंगिक शिक्षणाच्या करायला विरोध :-

संततिनियमन आणि लैगिक शिक्षणाचा प्रसार करत असताना कर्वेंना समाजातील खूप मोठ्या विरोधाला सामोरे जावे लागले. अगदी टाइम्स ऑफ इंडिया सारख्या वर्तमान पत्र देखील संतती नियमांच्या लेखाचा व जाहिरातीचा प्रसार करीत नसे, मात्र संततिनियमनाच्या कार्यास जेव्हा वीस बावीसवर्षानंतर एकोणीसशे एकतीस साली खानेसुमारीच्या अहवालात जेव्हा संततिनियमना संबंधी उल्लेख आला आणि हिंदुस्थान सारख्या गरीब देशाला संततिनियमनाशिवाय गत्यंतर नाही असेल जाहीर केले तेव्हा टाइम्स ऑफ इंडिया ने पत्रव्यवहाराच्या सदरात संततिनियमनाचा उल्लेख केला. तरीही तत्कालीन सरकार संततिनियमनाच्या साधनांच्या निर्मितीबाबतीत उदासीन होते.

### महात्मा गांधींच्या विचारांना विरोध

तत्कालीन भारतीय समाज संततीनियमनाच्या विरोधात होता, त्यामुळे कर्वेंच्या आधुनिक विचारास विरोधाला सामोरे जावे लागले. महात्मा गांधीदेखील याला अपवाद नव्हते. डिसेंबर एकोणीसशे चाळीस मध्ये संततीनियमनाच्या अमेरिकन प्रचारक मिसेस सॅनगर जेंव्हा महात्मा गांधीना भेटल्या तेंव्हा मिसेस सॅनगर ची मते गांधीना पटली नाहीत त्या संदर्भातील लेख २५ जानेवारीच्या इंग्रजी हरिजन मधे छापून आली. गांधींच्या मताला विरोध म्हणून कर्वेंनी १ फेब्रुवारी ला लेख लिहून बॉ बे क्रोनिकल च्या संपादकांकडे पाठवले पण ते छापले गेले नाही.

### गांधीजींची संततिनियमन व मानवी लैंगिकतेविषयीची मते :

गांधींच्या मते उत्तम आरोग्य राखण्याचा मार्ग म्हणजे शरीराच्या काही विशिष्ठ भागांचा उपयोग न करणे. संततिनियम ही पाश्चिमात्य संकल्पना आहे गांधींच्या मते पौर्वात्य लोकांची संख्या वाढल्यास पाश्च्यात्यांना त्यापासून धोका आहे, म्हणूनच त्या पौर्वात्य देशात संतती नियमांचं प्रसार करू पाहतात.

गांधींच्या मते संततिनियमांचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे मनोनिग्रह. प्रजोत्पत्तीपुरताच समागम करावा या मताचे गांधीजी होते.

गांधींसारख्या इतर विद्वानांनी उदा. श्री. प्रभाकर पाध्ये, मनोरमाबाई थत्ते, डॉ जरबानू मिस्त्री यांच्या विचाराशी मतभेद होता. वेळोवेळी कर्वेच्या कार्यावर विविध स्तरावर विरोध आणि आरोपांना सामोरे जावे लागले होते.

कर्वे यांनी चालविलेल्या समाजस्वाथ्य मासिकात मानवी लैंगिकतेविषयी शास्त्रशुद्ध पणे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. मानवी लैंगिकतेच्या संदर्भात व्यभिचार, स्त्री पुरुष तुलना, सुप्रजाजन, विवाह संस्था, संततिनियमन, विवाहाचा प्रश्न, अंतर्स्त्राव ग्रंथीचे महत्व, कामवासनेची मीमांसा, आरोग्य आणि कामशास्त्र काम शास्त्राचा सामाजिक विचार, कामविषयक स्वातंत्र्याच्या मर्यादा, कामवासनेचे महत्व कामवासनेचे मूळ, घटस्फोटाचा कायदा इत्यादी विषयावर लेख प्रसिद्ध केले आहेत.

श्री. ह. वि. देसाई यांनी घेतलेल्या मुलाखतीत प्रा. कर्वे तत्कालीन महाराष्ट्रीयन लोकांविषयी म्हणतात महाराष्ट्रीयन लोक भित्रे आहेत कारण लैंगिक प्रश्नावर लोक बोलणे व आपली मते व्यक्त करायला घाबरतात. कर्वे लैंगिक विषयावर कोणाशीही कितीही वेळ बोलू शकत होते.

कर्वे यांनी लैंगिकते संदर्भात हॅवलॉक एलिस व फ्रॉइड यांच्या मनोविश्लेषणाच्या कार्याचा विस्तृतपणे अभ्यास केला आहे. कर्वेच्या मते फ्रॉइडच्या या विषयातील संशोधनामुळे मानवी लैंगिकता या विषयात क्रांती घडून आली आहे.

## लैंगिक शिक्षण देण्याविषयी र. धों कर्वे यांचे मत

र. धों च्या मते मुलांना लैंगिकतेविषयी योग्य वेळी ज्ञान देणे गरजेचे आहे. पण त्यांच्या मते तत्कालीन समाज सनातनी वृत्तीनुसार असले ज्ञान किंवा शिक्षण देण्याचे कारण नाही. ही मुलांना योग्यवेळी आपोआप समजणारी गोष्ट आहे.

सनातन्यांच्या मते याबाबतीत प्रौढांनी सरळपणाने बोलू नये किंवा प्रसंगी खोटे बोलण्याशी हरकत नाही. पण र. धों च्या मते लैंगिकतेविषयी फार उघडपणे बोलल्यास विपरीत परिणाम होतील अशा भीतीने हे ढोंग सुरु झाले. परंतु या ढोंगामुळे अज्ञानाला वाव मिळतो, त्याचेच अधिक विपरीत परिणाम होतात. यासाठी लैंगिक शिक्षणाची गरज आहे. मात्र ते पद्धतशीररितीने द्यावे किंवा कसेतरी आणि मिळेल तसें, ज्याचे त्याने मिळवावे इतकाच प्रश्न शिल्लक राहतो. ते कसेतरी मिळाल्याने पुष्कळांचे गैरसमज तसेच शिल्लक राहतात त्यामुळे त्यांचे बरेच नुकसान होते. त्यामुळे लैंगिकते विषयी शास्त्रशुद्ध शिक्षण मिळाले पाहिजे असेल मत र. धों. चे आहे.

## डॉक्टर आणि शिक्षकांनी लैंगिक शिक्षण का व कसे द्यावे याविषयीं र. धों चे मत :

लैंगिक शिक्षण मुलांना द्यावेत याविषयी तत्कालीन तज्ज्ञ राजी होते असेल मत र धों नी मांडले आहे. र. धों च्या मते मुलांना लैंगिक शिक्षणाची सुरवात शारीरिक स्वच्छते पासून सुरु करावी. र. धों च्यामते लैंगिक शिक्षणाचे ज्ञान मुलांना विधायक मार्गातून मिळाले नाही तर मुळे अवैध मार्गाने ते ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतात. या बाबतीत शिक्षणाची गरज आहे हा शोध नवीन नाही. त्यांच्या मते वात्सायनाला हा शोध प्राचीन काळीच लागलेला होता. र धों च्या मते आई वडील व शिक्षकांना देखील असावे तितके ज्ञान दिसून येत नाही. व ज्यांना पुरेसे ज्ञान आहे ते हा विषयी शिक्षकांवर सोडतात तर शिक्षकांच्या मते हा विषय डॉक्टरांचा आहे. आणि डॉक्टरांनाही तो नीट साधतोच असे नाही, तर शिक्षण देण्याची पात्रता ही असावी लागते. त्यामुळे र. धों च्या मते शिक्षकांकरिता आणि आई बापांकरिता या विषयाचा एक शिक्षण क्रम आखून त्यांना प्रथम माहिती दिली पाहिजे.

### लैंगिक शिक्षणाचा प्रसारासाठी र धों च्या युक्त्या :

र धों च्या मते लैंगिक शिक्षणाच्या प्रसारामध्ये डॉक्टर खूप महत्वाची भूमिका पर पडू शकतात. डॉक्टर्स वेळोवेळी शिक्षकांच्या या विषयीच्या समस्यांचे समाधान देऊ शकतात.त्यांच्या मते लैंगिक शिक्षणाचे ज्ञान सर्व शिक्षकांना सक्तीने द्यावे. आई वडिलांना असेल शिक्षण आपण सक्तीने देऊ शकत नाही पण ज्यांना इच्छा आहे अशा पालकांसाठी माहितीपुस्तिका तयार कराव्यात, सरकारी खर्चाने माहितीपट तयार करावेत.

### लैंगिक शिक्षण देण्यासंबंधी मुलांच्या वयाबाबत र. धों चे मत :

#### ५ वर्षांपूर्वी :

लिंगविषयक सर्व माहिती मुलांना ५ वर्षांपूर्वी देणे शक्य नाही. मुलांना जसजशी जिज्ञासा निर्माण होईल तसतसे त्यांना ज्ञान द्यावे. मुले जगात कशी येतात?, त्यापूर्वी ती कोठे असतात. मुले असेल प्रश्न वयाच्या तिसऱ्या वर्षांपासून विचारू लागतात. पण या वयात स्त्री पुरुष आकर्षण मुलांना काळत नाही. सामान्यतः मुले अशा प्रकारचे प्रश्न तिसऱ्या वर्षांपासून विचारू लागतात. महत्वाचे म्हणजे दोनतीन वर्षाच्या मुलांना शिष्ट समाजात कोणते शब्द उच्चरलेले चालत नाहीत हे सांगणे इष्ट आहे.

#### वयवर्षे पाच नंतर :

वय वर्ष पाचनंतर गर्भधारणा कशी होते. बालकाचा जन्म कसा होते हे सांगणे इष्ट आहे असेल मत र धों नी मांडले आहे. पण ही माहिती मुलांनी प्रश्न विचारल्या नंतरच द्यावी आपल्याला योग्य वाटेल तेव्हा नव्हे.

#### वय वर्ष बारा पूर्वी :

काही बाबींची माहिती मात्र प्रश्नांची वाट न पाहता मुलांना देणे गरजेचे आहे. बाराव्या वर्षांपूर्वी मुलींना ऋतुस्रावाची माहिती द्यावी त्यामुळे त्या निष्कारण घाबरणार नाहीत. र धों च्या मते ही माहिती मुलांना देण्यासही हरकत नाही मुलांना देखील स्वप्नावस्था बद्दल सांगावे.

#### १२ वर्षांनंतर :

मुली मुलांपेक्षा लवकर वयात येतात व त्यांना स्त्री पुरुषातील आरक्षणाची जाणीव लवकर होते. अशावेळी याबद्दलची जाणीव मुलींना करून देणे गरजेचे आहे. स्त्री पुरुष संबंधात निसर्गतः वाईट असे काही नाही, परंतु ज्या समाजात आपल्याला राहावे लागते त्याच्या समजुतीनुसार नाही वागलो तर आपल्याला समाजाकडून त्रास होण्याचा संभव आहे., हे त्यांना पटवून दिले पाहिजे. या बाबतीत नैसर्गिक प्रवृत्तींना आळा घालणे कठीण असते आणि ते नैतिक व्याख्यानाने होत नाही. अमुक करावे किंवा करू नये, असे सांगण्यापेक्षा अमुक रीतीने वागल्यास परिणाम अमुक होण्याचा संभव आहे इतकेच सांगावे.

#### विवाहापूर्वी :

विवाहापूर्वी मुलांना मुलींना समागम ही दोघांच्या संमतीने होणारी गोष्ट आहे या बाबतीत दोघांनी एकमेकांच्या भावनांचा व सोयीगैरसोयींचा विचार केल्यास अधिक सुख प्राप्त होते. र धों च्या मते लैंगिक शिक्षण केवळ घरी किंवा शाळेत संपत नाही तर आवश्यक तेव्हा सल्ला देण्याऱ्या संस्था देखील असाव्यात. त्यामुळे सर्वांचाच फायदा होईल.

**शिक्षक :**

लहान मुलांचा विचार केल्यास प्रथम त्यांना या विषयाची माहिती घेतलीच पाहिजे, अशी सक्ती शिक्षकांवर करणे गरजेचे आहे आणि हे शिक्षण देण्याची व्यवस्था शिक्षक तयार करणाऱ्या संस्थातुन दिली पाहिजे. (स्त्री , फेब्रुवारी १९२६, पृ. ३३९)

समाजाच्या लेखी अस्पृश्य असलेल्या लैंगिक शिक्षणासारख्या गंभीर नि महत्त्वाच्या विषयाचा परिपूर्ण अभ्यास करून त्यावर स्वतंत्रपणे सातत्याने परखड विचार मांडण्यासाठी 'समाजस्वास्थ्य' मासिकाला रधों यांनी आपले हत्यार बनवले. समाजातून प्रचंड विरोध होत असतानाही रधोंच्या प्रामाणिक सचोटीचा हेतू कधीच डळमळीत झाला नाही. अशा दृढनिश्चयी समाजसुधारकाला आपली सरकारी खात्यातील नोकरीही सोडण्याची वेळ आली.तरीही त्यांनी माघार घेतली नाही.

रधोंनी हिंदू देवदेवतांच्या लीलांना व्यभिचार मानले. व्यभिचार या कल्पनेचेच उघडपणे समर्थन करत सनातनी धर्मवाद्यांना अंगावर घेणाऱ्या रधोंनी झुंडशाही महाप्रवाहाच्या विरोधात जिद्दीने तोंड दिले.

थोडक्यात समाजातून आणि राजकीय क्षेत्रातून मोठ्या प्रमाणातून विरोध होत असतानाही र. धो. डगमगले नाहीत. शेवटपर्यंत अविरतपणे ते आपल्या विचारांवर ठाम राहिले. लैंगिक शिक्षण कसे आणि कधी द्यावे याबद्दल त्यांचे विचार आजही चिंतनीय आहेत.

**संदर्भ :**

1. **डॉ. अनंत देशमुख**(**ऑक्टोबर २०१०**), **रधों समाजस्वाथ्य मधील निवडक लेख**,**पुणे**, **पदमगंधा प्रकाशन डॉ. अनंत देशमुख**(**ऑक्टोबर २०१०**), **रधों समाजस्वाथ्य मधील निवडक लेख**,**पुणे**, **पदमगंधा प्रकाशन.**
2. **डॉ. अनंत देशमुख**(**ऑक्टोबर** 2010), **रधों असंग्रहित र. धों. कर्वे संशोधन व प्रस्तावना** , **पुणे**, **पदमगंधा प्रकाशन.**
3. https://www.thequint.com/entertainment/rd-karve-meet-the-man-who-pioneered-sex-education-in-the-1920s-in-a-play-with-girish-kulkarni
4. https://en.m.wikipedia.org/wiki/Raghunath_Dhondo_Karve